# MAHARASHTRA ACT No. XLV OF 1972

## THE MAHARASHTRA SPECIFIED CO-OPERATIVE SOCIETIES POSTPONEMENT OF ELECTIONS (DUE TO SCARCITY CONDITIONS IN THE STATE) ACT, 1972

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १६ डिसेंबर १९७२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XLV OF 1972

## AN ACT TO PROVIDE FOR THE POSTPONEMENT OF ELECTIONS TO COMMITTEES OF SPECIFIED CO-OPERATIVE SOCIETIES BECAUSE OF WIDE-SPREAD SCARCITY CONDITIONS IN THE STATE.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २१ डिसेंबर १९७२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

## सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५

राज्यात सर्वदूर असलेल्या टंचाईच्या परिस्थितीमुळे विनिर्दिष्ट सहकारी संस्थांच्या समित्यांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम ७३-ग मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गांतील सहकारी संस्थांच्या समित्यांच्या सदस्यांच्या निवडणुका, जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली घेणे आवश्यक आहे;

**आणि ज्याअर्थी,** राज्याच्या बहुतांश जिल्ह्यांत सर्वदूर असलेल्या टंचाईच्या परिस्थितीमुळे, विनिर्दिष्ट संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी ज्यांची आवश्यकता आहे असे जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व त्यांचा कर्मचारीवर्ग यांना, टंचाई निवारणविषयक कामे आणि शासनाची रब्बी पीक मोहीम यांकरिता आपली सर्व शक्ती लावणे आवश्यक होते. आणि परिणामी ते निवडणूक कामासाठी उपलब्ध होऊ शकले नसते; तसेच या गंभीर परिस्थितीत, अशा निवडणुका घेणे सर्वसामान्य जनतेसही गैरसोयीचे झाले असते;

आणि ज्याअर्थी, या आणि इतर कारणांसाठी विनिर्दिष्ट संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका व पोट-निवडणुका विवक्षित मुदतीसाठी लांबणीवर टाकणे इष्ट होते;

आणि ज्याअर्थी (निवडणुका) अशा रीतीने लांबणीवर टाकल्याच्या परिणामी, समित्यांच्या काही सदस्यांचा व प्रशासकांचा पदावधी वाढविणे आवश्यक होते;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

आणि ज्याअर्थी, निवडणुका लांबणीवर टाकणे आणि वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे, पदावधी वाढविणे आणि तत्संबंधित इतर गोष्टी यांची तरतूद करण्यासाठी, त्वरित कार्यवाही करणे ज्यामुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती, आणि त्यांनी महाराष्ट्र विनिर्दिष्ट सहकारी संस्था (राज्यातील टंचाईच्या परिस्थितीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७२ हा, ३१ ऑक्टोबर १९७२ रोजी प्रख्यापित केला होता;

आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेले काही फेरबदल करून, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे आवश्यक आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे:—

संक्षिप्त नाव प्रारंभ, आणि कालावधी.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विनिर्दिष्ट सहकारी संस्था (राज्यातील टंचाईच्या परिस्थितीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७२ असे म्हणता येईल.

(२) तो, ३१ ऑक्टोबर १९७२ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल;

(३) तो, ३१ डिसेंबर १९७३ हा दिवस धरून, त्या दिवसापर्यंत किंवा राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल अशा अगोदरच्या तारखेपर्यंत, अंमलात राहील. आणि त्यानंतर तो समाप्त होईल. मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे, या अधिनियमाच्या समाप्तीनंतर जणू काही हा अधिनियम महाराष्ट्र अधिनियमाद्वारे रद्द करण्यात आला असल्याप्रमाणे लागू होईल.

व्याख्या.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "प्रशासक", "समिती" आणि "संस्था" यांना सहकारी संस्था अधिनियमात जे अर्थ नेमून दिले असतील तेच अर्थ असतील;

(ब) "विनिर्दिष्ट संस्था" म्हणजे, सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ७३-ग मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रवर्गातील संस्था;

(क) "सहकारी संस्था अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.

विनिर्दिष्ट संस्थांच्या समित्यांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे.

३. (१) सहकारी संस्था अधिनियम आणि तदन्वये केलेले नियम आणि उपविधी यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) हा अधिनियम अंमलात असेल त्या मुदतीत, कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेच्या समितीची कोणतीही निवडणूक किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेच्या समितीतील कोणतीही तात्पुरती रिकामी झालेली जागा भरण्यासाठी निवडणूक घेण्यात येणार नाही; परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, अशा कोणत्याही निवडणुकीस सुरुवात झाली असेल आणि उमेदवारी मागे घेण्याची तारीख उलटून गेली असेल त्याबाबतीत, अशी निवडणूक पूर्ण करण्यात येईल;

(ब) विनिर्दिष्ट संस्थांच्या समित्यांचे [ या पोट-कलमाच्या खंड (अ) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे ज्यांची निवडणूक पूर्ण करावयाची असेल त्या समित्या वगळून ] जे सदस्य या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस पदावर असतील त्यांच्या पदाची मुदत [ हा अधिनियम अंमलात असेल त्या काळात कोणत्याही वेळी, उक्त तारखेपूर्वी त्यांची मुदत संपलेली असो किंवा उक्त तारखेनंतर संपणार असो ] वाढविण्यात आल्याचे किंवा यथास्थिती वाढवावयाची असल्याचे समजण्यात येईल; आणि असे सदस्य हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत पद धारण करण्याचे चालू ठेवतील;

(क) सहकारी संस्था अधिनियमाचे कलम ७८, पोट-कलम (१) याअन्वये नेमण्यात आलेले, कोणत्याही विनिर्दिष्ट सहकारी संस्थांच्या कारभाराची व्यवस्था पाहणारे जे कोणतेही प्रशासक, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस पदावर असतील त्या प्रशासकांच्या पदाची मुदत (हा अधिनियम अमलात असेल त्या काळात कोणत्याही वेळी, उक्त तारखेपूर्वी त्यांची मुदत संपलेली असो अथवा उक्त तारखेनंतर संपणार असो) वाढविण्यात आली असल्याचे किंवा यथास्थिती वाढवावयाची असल्याचे समजण्यात येईल ; आणि असे प्रशासक, हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत, पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा, कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेच्या समितीच्या सदस्याची किंवा सदस्यांची निवडणूक घेण्याबद्दल निदेश देणारा या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी दिलेला किंवा संमत केलेला कोणत्याही न्यायालयाचा न्यायनिर्णय, डिक्री किंवा आदेश यावर परिणाम होणार नाही, आणि न्यायालयाच्या निदेशानुसार, अशी निवडणूक घेण्यात येईल आणि ती पार पाडण्यात येईल आणि उक्त समिती प्रस्थापित करण्यात येईल.

४. प्रत्येक विनिर्दिष्ट संस्थेच्या समितीस, तिच्या सदस्यांच्या राजीनाम्यामुळे मृत्यूमुळे किंवा अन्य स्वीकृत करून
कारणामुळे रिकामे झालेले कोणतेही पद भरण्यासाठी, याबाबतीत यथोचित अर्हताप्राप्त अशा कोणत्याही घेण्याची
शक्ती.
सदस्यास स्वीकृत करून घेण्याची शक्ती असेल.

५. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी किंवा तात्पुरत्या
त्यानंतर, नोंदणी झालेल्या विनिर्दिष्ट संस्थेच्या बाबतीत आणि त्या संस्थेच्या नोंदणीसाठी केलेल्या अर्जात समित्या
सहभागी असतील अशा सर्व व्यक्तींची पहिली सर्वसाधारण सभा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस प्रस्थापित
किंवा त्यानंतर घ्यावयाची असेल त्याबाबतीत, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ याच्या नियम करणे.
५९ यास अनुसरून तात्पुरती समिती प्रस्थापित करण्यात येईल आणि अशा रीतीने प्रस्थापित केलेल्या
तात्पुरत्या समितीचे सदस्य, हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीपर्यंत, पद धारण करतील.

६. कलम ३ अन्वये ज्यांचा पदावधी वाढविण्यात आल्याचे समजण्यात येईल किंवा यथास्थिती कलम ३
अन्वये ज्यांचा वाढला असेल अशा कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थांच्या कामकाजाच्या व्यवस्थेसाठी नेमण्यात आलेल्या अन्वये ज्यांचा
वाढला असेल अशा कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थांच्या कामकाजाच्या व्यवस्थेसाठी नेमण्यात आलेल्या
समित्यांचे सर्व सदस्य व सर्व प्रशासक हे, अशा रीतीने वाढविण्यात आलेल्या संपूर्ण मुदतीत, असे सदस्य पदावधी
किंवा, यथास्थिती, प्रशासक म्हणून, सर्व शक्तींचा वापर करण्यास आणि सर्व कर्तव्ये आणि कामेही पार वाढला असेल
पाडण्यास सक्षम असतील ; आणि पदावधी वेळीच वाढविण्यात आलेला नव्हता किंवा अन्यथा तो यथोचित अशा समि-
रीत्या वाढविण्यात आलेला नव्हता किंवा वाढविलेल्या कालावधीत, समिती, सदस्य किंवा प्रशासक यांस, त्यांच्या आणि
यथास्थिती, समितीच्या सदस्यांच्या किंवा प्रशासकांच्या सर्व शक्तींचा वापर करता आला नाही आणि सदस्यांच्या व
त्यास सर्व कर्तव्ये आणि कामे पार पाडता आली नाहीत याच केवळ कारणावरून, उक्त कालावधीतील प्रशासकांच्या
अशा कोणत्याही समितीची, सदस्याची किंवा प्रशासकाची कोणतीही कृति अवैध असल्याचे मानण्यात कृतींची
येणार नाही किंवा कोणत्याही न्यायालयात ती विरुद्ध हरकत घेता येणार नाही. विधिग्राह्यता.

७. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने शासकीय राजपत्रात अधिसूचित विद्यमान
करावयाच्या तारखेनंतर (ही तारीख हा अधिनियम समाप्त होण्यापूर्वीची तारीख असेल) हा अधिनियम समित्या आणि
अंमलात असताना विद्यमान समित्या व प्रशासक यांचा वाढविण्यात आलेला पदावधी समाप्त होण्यापूर्वी, प्रशासक
सहकारी संस्था अधिनियम आणि तदन्वये केलेले नियम व उपविधी यांच्या उपबंधानुसार, नवीन यांची
समित्या प्रस्थापित करण्याची व्यवस्था संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडून करण्यात येईल. वाढविलेली
मुदत
संपण्यापूर्वी
नवीन
समित्या
प्रस्थापित
करण्याची
व्यवस्था
करणे.

८. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा तरतूद करण्यात येईल त्याशिवाय, सहकारी संस्था अधिनियम हा, इतर सर्व बाबतीत, संबंधित विनिर्दिष्ट संस्थेस प्रयुक्त असेल.

९. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना किंवा त्यातील कोणत्याही गोष्टीमुळे किंवा या अधिनियमातील कोणत्याही बाबीसंबंधी, सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्थांसंबंधीचा इतर कोणताही विधि याचे उपबंध अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवेल तर, राज्य शासनास प्रसंगानुसार, आदेशाद्वारे, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ त्यास आवश्यक असल्याचे आढळून येईल अशी कोणतीही गोष्ट करता येईल.

१०. (१) महाराष्ट्र विनिर्दिष्ट सहकारी संस्था (राज्यातील टंचाईच्या परिस्थितीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७२ हा, याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने रद्द करण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये केलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.